984

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.२/का.०६,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३०/०१/२०१५

प्रति,
मुख्याधिकारी,
सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती

**विषय** :- आगामी नगरपरिषदा / नगरपंचायत निवडणुकांच्या अनुषंगाने मतदार जागृती अभियान राबविणे तसेच निवडणुकीमध्ये संगणक आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे...

महोदय,

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न्याय्य, मुक्त व पारदर्शक रितीने घेण्याची संविधानिक जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या निवडणुका मुक्त व पारदर्शक रितीने घेण्यासाठी लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये जी दक्षता व उपाययोजना करण्यात येतात त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नाही असे आढळून आले आहे. सबब असे निर्देश देण्यात येत आहेत की, यापुढे निवडणुका होणा-या नगरपरिषदा / नगरपंचायत निवडणुकीमध्ये प्रत्येक टप्प्यावर कोणकोणती कार्यवाही करणे अथवा सुधारणा करणे आवश्यक आहे याचा अभ्यास आतापासून सुरु करावा. २०१५ मध्ये ८ नगरपरिषदा, पांढरकवडा हद्दवाढ क्षेत्राची व शासनाकडून १३० नवीन नगरपंचायतींची स्थापना अंतिमरित्या केली गेल्यास त्या नगरपंचायतींच्या तसेच २०१६ मध्ये सुमारे १९५ नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत.

२. नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता सर्व उपाययोजना करणे आवश्यक असून त्यासंदर्भात आतापासून कार्यवाही सुरु करावी. जेणेकरुन त्याचे फलित पुढील निवडणुकीमध्ये प्राप्त होईल. उदा.म्हणून:-

(i) मतदार यादीमध्ये मतदारांनी आपली नावे नोंदविणे, वगळणे तसेच यादीमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करणे, मतदानाची टक्केवारी वाढणे याकरिता वेळीच अर्ज द्यावेत यासाठी मतदार जागृती करणे.

(ii) मतदाराला मतदान करण्याबाबत सुखद अनुभव यावा याकरिता प्रयत्न करणे.

(iii) प्रत्येक प्रभागात एक आदर्श मतदान केंद्र निर्माण करुन तेथे मतदाराला सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे व त्यानुसार इतर मतदान केंद्रांची स्थापना करण्याबाबत प्रयत्न करणे.

(iv) मतदारांना जी आवाहने करावयाची आहेत ती मतदारांपर्यंत पोहोचविण्याकरिता संपर्काचे नवनवीन पर्याय शोधून काढणे.

(v) मागील निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांच्या शपथपत्रातील माहितीचे विश्लेषण करुन मतदारांसमोर ठेवणे.

(vi) निवडणुकीकरिता अर्ज भरणा-या सर्व उमेदवारांची शपथपत्रे तात्काळ वेबसाईटवर मतदारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देणे.

३. मतदार जागृतीबाबत करावयाच्या वरील बाबींबरोबरच आगामी नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांमध्ये पुढील बाबींचा अवलंब करण्यात येणार आहे.

(i) संगणकाद्वारे प्रभाग रचना करणे.

(ii) मतदार यादीचे विभाजन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून करणे.

(iii) ऑनलाईन नामनिर्देशन प्रक्रियेचा वापर करणे.

४. वरील सर्व बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता नगरपरिषद / नगरपंचायतींनी त्यांच्या स्तरावर अभ्यास गट स्थापन करावा व त्यानुसार आपल्या स्तरावर कामकाज करण्यास तात्काळ सुरुवात करावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :- (i) सचिव(२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(ii) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

(iii) सर्व विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

(iv) सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, या पत्रामध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता होण्याच्या दृष्टीने जिल्हयातील नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या मुख्याधिका-यांची बैठक घेऊन आवश्यक त्या सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.